सकाळ

शुक्रवार,
२३ ऑगस्ट २०१९ ३

# महाडिक अभियांत्रिकीत सेल्स ॲकॅडमी

**इस्लामपूर** : पेठ (ता. वाळवा) येथील नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयात आयटीएम स्कील ॲकॅडमी संचालित आयसीआयसीआय बँकेच्या सेल्स ॲकॅडमीचे उद्घाटन झाले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे रजिस्ट्रार डॉ. विलास नांदवडेकर, सेंट्रल प्लेसमेंट ऑफिसर डॉ. जी. एस. राशीनकर, व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक, कार्यकारी संचालक प्रा. महेश जोशी, महाराष्ट्र व गोव्याचे आयटीएम हेड संग्राम देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन झाले. डॉ. नांदवडेकर, राहुल महाडिक, डॉ. राशीनकर, प्रा. महेश जोशी यांनी मार्गदर्शन केले. संग्राम देशमुख यांनी आयटीएम स्कील अकॅडमी भारतात चार शाखांद्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देते, त्याद्वारे ६०० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत, अशी माहिती दिली. आयसीआयसीआय बँकेचे तनय टंडन, पुनित त्रिवेदी, प्रा. आशिष पारेख, विवेक आजमाने उपस्थित होते.